## अमळनेरात २७ ला कुस्त्यांची महादंगल

अमळनेर । प्रतिनिधी

येथील बंगाली फाईल मधील बालवीर व्यायामशाळेतर्फे २७ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजेला कुस्त्यांची महादंगल होणार असून सुप्रसिद्ध पैलवान नेपाळ केसरी देवा थापा व हरियाणा केसरी शेरा पैलवान यांच्यात प्रमुख कुस्ती होणार आहे. भरत पवार यांनी या कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले असून इंदिरा भवनच्या मागे ग्रामीण रुग्णालयासमोरील मैदानात या स्पर्धा होणार आहेत. ऋतिक राजपूत धुळे आणि शमशाद पैलवान दिल्ली यांच्यात दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती होणार आहे. यासह चुरशीच्या १३ कुस्त्या होणार आहेत. प्रमुख कुस्तीसाठी १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. तर द्वितीय कुस्तीसाठी एक लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहेत. या कुस्त्यांसाठी पंच म्हणून युनूस पैलवान, आप्पा पाटील, विनोद पैलवान, शकील पैलवान काम पाहणार आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बालवीर व्यायामशाळा, छत्रपती शिवाजी व्यायामशाळा, दि प्रतापकुमार व्यायामशाळा यांचे सहकार्य लाभत आहे. कुस्ती प्रेमींनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन बालवीर व्यायामशाळेतर्फे करण्यात आले आहे.

## श्रीक्षेत्र सुकेश्वर येथे आजपासून संगीतमय रामायण

रवंजे, ता.एरंडोल । वार्ताहर

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र सुकेश्वर येथे आजपासून कै रामदास वरसाडेकर हभप नामदेव बाबा याच्या आशिर्वादानेसंगीतमय रामायण सुरू होणार असून दि.२८ रोजी सांगता होणार आहे. तरी परिसरातून भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आयोजक संस्थेचे अध्यक्ष विजय भामरे यांनी कळविले आहे. कथा प्रवक्ते कृष्णदास महाराज अयोध्याकर हे रहाणार आहेत त्यास तबलावादक प्रकाश महाराज सोनु महाराज कैलास महाराज जळगावकर व भजनी मंडळी उपस्थित रहाणार आहे.

## चाळीसगावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिग्नल यंत्रणा बसणार

चाळीसगाव । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिग्नल यंत्रणा बसवा याछत्रपती शिवाजी महाराज चौकात अनेकदा अपघात होत असतात, आणि मागील काळात महिनाभरात दोन लोकांना याच चौकात जीव देखील गमवावा लागला होता, त्यामुळे संभाजी सेनेच्या वतीने सदर छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिंगल यंत्रणा बसवा अन्यथा संभाजी सैनिक याच चौकात रस्ता रोको आंदोलन करतील अशा आशयाचे निवेदन २० जानेवारी रोजी देण्यात येऊन २० एप्रिल पर्यंत सिग्नल यंत्रणा कार्यान्वित न केल्यास २१ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात संभाजी सेनेच्या वतीने संभाजी सैनिक रस्ता रोको आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला होता, त्या अनुषंगाने १५ एप्रिल रोजी संभाजी सेनेचे पदाधिकारी मुख्याधिकारी सौरभ जोशी यांना सिग्नल यंत्रणेच्या बाबत जाब विचारायला गेले असता, संभाजी सेनेने निवेदन दिल्यानंतर सिग्नल यंत्रणा बसविणे संदर्भात संबंधित वरिष्ठ कार्यालयांशी केलेला पत्रव्यवहार दाखवून त्या संदर्भात चर्चा करून लवकरात लवकर सिग्नल यंत्रणा बसविली जाईल असे लेखी आश्वासन देऊन तसे अधिकृत पत्र देखील संभाजी सेनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले असल्याची माहिती संभाजी सेनेचे लक्ष्मणबापु शिरसाठ यांनी दिली आहे.

## प्रा.भगवान खोंडे यांचा आज सेवापूर्ती सोहळा



धरणगाव । प्रतिनिधी

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथील पर्यवेक्षक प्रा.भगवान लटकन खोंडे यांचा सेवापुर्ती सोहळा आज दि.२१ रोजी पी. आर. हायस्कूल सोसायटी धरणगाव व महाविद्यालयांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. ३० वर्षे सेवा पूर्ण करून प्रा.बी.एल.खोंडे आज सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या जीवन प्रवास हा अत्यंत बिकट असून मोलमजुरी करून, आपला पारंपारिक सलून व्यवसाय करत त्यांनी शिक्षण घेतले. प्राथमिक शिक्षण आपल्या मूळ गावी वंजारी येथे तर माध्यमिक शिक्षक चावलखेडा येथे इयत्ता दहावीपर्यंत, उच्च माध्यमिक शिक्षण धरणगाव कॉलेजला आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण एम जे कॉलेज जळगाव येथे घेतले. शिक्षण घेत असतानाच वडिलांच्या निधनाने परिवारासाठी मोठा आघात असताना दुसरे बंधू यांचे निधन झाले. दुसऱ्या वर्षी आईचे मातृछत्र हरपले. अशा अनेक संकटांचा सामना करत खचून न जाता पाच भाऊ दोन बहिणी असा मोठा परिवार त्यांनी सांभाळला. परिस्थिती हलाखीची असताना एमएबीएड पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९९४ साली कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे हिंदी विषयाचे प्राध्यापक म्हणून निवड झाली. त्यांनी आपल्या कुशल नेतृत्व गुणवत्तेच्या प्रभावामुळे महाविद्यालयात जम बसविला. एनएसएस कार्यक्रमाधिकारी, पर्यवेक्षक, मुक्त विद्यापीठ केंद्र संयोजक, प्रभारी उपप्राचार्य पदे त्यांनी भूषविली. पदभूषित असताना सरांचे पाय नेहमी जमिनीवरच होते. कधीही गर्व, अहंकार अंगी न बाळगता ते प्रत्येकाशी इमाने इतबारे न्याय देत गेले. महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सर्वतोपरी झटत राहिले आणि आपल्यापरीने मोलाचे योगदान देत राहिले.

## पाळधीत येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

पाळधी, ता.धरणगाव । वार्ताहर

येथे दि. २३ एप्रिल बुधवार रोजी श्रीराम मंदिर पाळधी बुद्रुक येथे सकाळी नऊ ते दोन वाजेपर्यंत पाळधी गाव व परिसरातील गरीब गरजू लोकांसाठी मोफत डोळे तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात साई दादा अध्यात्मिक सेवा ट्रस्ट द्वारा संचालित एरंडोल येथील अश्विनी कुमार नेत्रालयचे तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाने शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिर दर महिन्याला २३ तारखेला च घेण्यात येणार असून गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिरात येताना रेशन कार्ड व आधार कार्ड सोबत आणावे असे आवाहन श्रीराम जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष सचिव व सदस्यांनी केले आहे.

### : नांदा सौख्यभरे :

## चि.सुशिल व चि.सौ.कां.अश्विनी





जळगाव । प्रतिनिधी

कासोदा ता.एरंडोल (ह.मु. जळगाव) येथील गं.भा.लताबाई व कै. माधवराव रघुनाथ शितोळे यांचे चिरंजीव सुशिल व भटाने, ता.शिरपुर, जि. धुळे येथील गं.भा.वैशाली व कै. ज्ञानेश्वर पोपट पाटील यांची सुकन्या चि.सौ.कां.अश्विनी यांचा शुभविवाह सोमवार दि.२१ एप्रिल रोजी दुपारी १२.१५ वा. देवराम नगर, निमखेडी शिवार, शेतकी शाळेसमोर, जळगाव येथे संपन्न होत आहे.

## चि.सौ.कां.हर्षाली-चि.विशाल





मुक्ताईनगर । प्रतिनिधी

नायगाव ता.मुक्ताईनगर येथील विश्वनाथ धोंडू सावळे यांची नात व कै केशव विश्वनाथ सावळे यांची कन्या चि.सौ.कां.हर्षाली व शांताराम पोपट सोनवणे राहणार वरणगाव यांचे चिरंजीव चि.विशाल यांचा शुभ मंगल विवाह आज दि.२१ एप्रिल रोजी नायगाव तालुका मुक्ताईनगर येथे संपन्न होत आहे.

# धरणगावात रंगला कुस्त्यांचा आखाडा

### मानाची कुस्ती पृथ्वीराज पाटील व शमशाद शेख यांच्यात बरोबरीत सुटली



धरणगाव । प्रतिनिधी

हनुमान जयंतीनिमित्त येथील इंदिरा गांधी विद्यालयाच्या मैदानात जोरदार कुस्तींचा आखाडा रंगला. पुणे येथील महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील, दिल्ली येथील भारत केसरी शमशाद शेख यांच्यात चितपट न होता कुस्ती बरोबरीत सोडण्यात आल्याने दोघंही मल्लांना चांदीची गदा आणि १ लाख रुपये रोख विभागून देण्यात आले. याप्रसंगी ६२ मल्लांच्या रंगतदार कुस्त्या झाल्या.

प्रारंभी प्रतापराव पाटील, गुलाबराव वाघ, भगवान महाजन, अॅड.संजय महाजन, निलेश चौधरी, विनय भावे, कैलास माळी, विलास महाजन, अॅड. व्ही एस भोलाणे, कडू महाजन, महेंद्र महाजन, भागवत चौधरी, गुलाबराव मराठे, अॅड. शरद माळी यांसह उपस्थित पत्रकार बांधवांच्या हस्ते आखाड्याचे व हनुमंतरायाच्या प्रतिमेचे पूजन करून कुस्त्यांची सुरूवात करण्यात आली.

गेल्या दहा वर्षांपासून चंदनगुरु क्रीडा प्रसारक मंडळाच्यावतीने कुस्त्या आयोजित केल्या जातात. कुस्त्यांची सुरुवात ५०० रुपयांच्या लहान मल्लांपासून शेवटची कुस्ती चांदीची गदा व रोख स्वरूपात १ लाख रुपये बक्षिसाची होती. नामांकित मल्लांमुळे कुस्दतीबद्दल लोकांचे आकर्षण वाढत आहे असे मत चंदनगुरु क्रीडा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पहिलवान दिलीप महाजन यांनी व्यक्त केले.

कुस्तीचे पंच म्हणून किशोर पहिलवान, अनिल पहिलवान, रघुनाथ पहिलवान, शाहरुख पहिलवान यांनी काम पाहिले. कुस्तीचे आयोजन यशस्वीतेसाठी चंदनगुरु क्रीडा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद रोकडे यांनी, सूत्रसंचलन पी डी पाटील यांनी तर आभार ड. संजय पहिलवान महाजन यांनी मानले.

# श्री वर्णेश्वर महादेव मंदिर परिसर विकास कामांचे भूमिपूजन

अमळनेर । प्रतिनिधी



येथील श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थान परिसराचा कायापालट करणाऱ्या २.४० कोटीच्या विकास कामांचे भूमिपूजन आ.अनिल भाईदास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.स्मिता वाघ या होत्या.

श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थान परिसरात होत असलेली विकास कामे अमळनेरचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेत असे आ.अनिल पाटील यांनी सांगितले. अध्यक्षिय भाषणात खा.स्मिता वाघ यांनी श्री वर्णेश्वर महादेव मंदिर पुरातन असून नव्याने होणाऱ्या विकास कामांमुळे अमळनेरच्या धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन मिळेल असे सांगितले. श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानचे अध्यक्ष सुभाष चौधरी यांनी उपस्थित प्रमुख अतिथी यांचे स्वागत व सत्कार ट्रस्टतर्फे केला. याप्रसंगी मंचावर संस्थेचे ट्रस्टी संजय पाटील, संजय शुक्ल, अर्बन बँकेचे व्हाईस चेअरमन रणजित शिंदे, अॅड.व्ही.आर. पाटील, भिकन वाडीले, कृ.उ.बा.संचालक हिरालाल पाटील, भाजप शहराध्यक्ष विजय राजपूत, सेवानिवृत्त न्यायाधीश गुलाबराव पाटील, मराठा समाज कार्यालयाचे अध्यक्ष जयवंतराव पाटील, खा.शि.मंडळाचे संचालक हरी भिका वाणी आदि प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी श्री वर्णेश्वर मंदिर परिसरात चोपडा रोड ते श्री वर्णेश्वर महादेव मंदिर या रस्त्याचे भूमिपूजन, भक्तनिवास असलेल्या समाज भवनाचे भूमिपूजन, श्री वर्णेश्वर महादेव मंदिर परिसरातील तलावाचे सुशोभिकरण व मंदिर परिसराच्या वॉल कंपाऊंड चे नारळ फोडून व कुदळ मारून मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. उपस्थित प्रमुख मान्यवरानमध्ये हेमंत भांडारकर, राजू फाफोरेकर, देविदास देसले, सुनिल पाटील, अॅड.तिलोत्तमा पाटील, महेश कोठवदे, डॉ.संजय शहा, गणेश पाटील, राजेंद्रभोला टेलर, भरत परदेशी, विजय पवार, हेमंत पवार, सुरेश पाटील, रामराव पवार, सौ पायल पाटील, अनिल कासार आदिंसह शिवभक्त व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रामराव पवार, नारायण बडगुजर, राजू देसले, भावेश चौधरी, सतीश धनगर आदींसह श्री वर्णेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आत्माराम चौधरी यांनी केले.

# यावल तालुका भाजपा अध्यक्षांची बिनविरोध निवड

यावल । प्रतिनिधी



तालुक्यात भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक निवडणुकीच्या माध्यमातून आणि सामाजिक सलोखा ठेवावा या दृष्टिकोनातूनतसेच संघटनात्मक दृष्टिकोनातून संघटना मजबुती करण्यासाठी पक्षाने ठरवलेल्या ध्येय धोरणानुसार नवीन तीन तालुका अध्यक्ष नियुक्त करण्यात आले ही निवड जिल्हा सरचिटणीस भाजपा राकेश पाटील यांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या प्रमुख उपस्थितीत यावल तालुका शेतकरी सहकारी संघाच्या सभागृहात पार पडली त्यात बिनविरोध तिघांची निवड करण्यात आली.

किनगाव द हिगाव मंडळाचेअध्यक्षपदी अनिल रामराव पाटील रा.किनगाव तसेच यावल मंडळ अध्यक्ष म्हणून सागर कोळी राहणार राजोरा तर फैजपूर मंडळाचे अध्यक्ष पदी उमेश बेंडाळे राहणार न्हावी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा माजी उपाध्यक्ष शरद महाजन माजी जी प सभापती रवींद्र सूर्यभान पाटील, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती नारायण बापू चौधरी माझी जी प सभापती हर्षल गोविंदा पाटील उमेश फेगडे भाजपा तालुका मावळते अध्यक्ष, नितीन चौधरी सर दूध संघ संचालक, माजी पंचायत समिती सभापती भरत महाजन यावल कृउबा सदस्यउ जैन सिंग राजपूत पाटील डॉक्टर सुनील पाटील साखळी नागेश्वर साळवे सावखेडा यावल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राकेश फेगडे सविता अतुल भालेराव माझी जि प सदस्य हेमराज हेगडे निलेश गडे शहर अध्यक्ष भाजपा राहुल बारी अतुल भालेराव उपसभापती शेतकरी संघ, निलेश राणे नितीन चौधरी लहू पाटील व्यंकटेश बारी भूषण फेगडे वीर येवले अनिकेत सोरटे सर्व मंडळातील तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. तीन अध्यक्षांच्या बिनविरोध निवडीबद्दल राज्याचे मंत्री नामदार गिरीश महाजन, भाजपा जिल्हा अध्यक्ष जळगाव पूर्व आमदार अमोल जावळे, केंद्रीय राज्यमंत्री ना.रक्षाताई खडसे यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# शेतात बकऱ्या चारण्यावरुन वाद; एकास बेदम मारहाण

चाळीसगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील ओढरे येथे शेतात बकऱ्या चारण्यावरुन झालेल्या वाद सोडविण्यास गेलेल्या एकास बेदम मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पांडुरंग बालचंद पवार, वय ३१ वर्ष, धंदा ता.चाळीसगाव हे दि.१९ रोजी सकाळी १०.३० वा. विजु रमेश चव्हाण यांचे शेतात बकऱ्या चारत असतांना, संतोष राठोड यांचा मुलगा निर्दोष संतोष राठोड हा तेथे आला व ते त्याने, तु येथे का बकऱ्या चारत आहे, येथे आम्ही बकऱ्या चारु, यावरुन त्यास समजावुन सांगत असतांना, त्याला राग आल्याने दोघांमध्ये वाद झाला आहे, त्यावेळी तेथे संतोष गुलाब राठोड, निर्दोश संतोष राठोड, पुजा संतोष राठोड, मोहीना संतोष राठोड असे भाऊ गोरख बालचंद याचे सोबत संतोष गुलाब राठोड याचे शेताच्या बांधावर वाद करीत होते. त्यावेळी आम्ही सदर ठिकाणी गेलो व त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न करीत असतांना, वरील सर्वांनी आम्हाला शिवीगाळ करून पांडुरंग बालचंद पवार यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच संतोष राठोड व निर्दोश राठोड यांनी त्यांचे हातातील लाकडी काठीने बालचंद चांदू पवार याच्या डोक्यात मारुन दुखापत केली.

तसेच निर्दोश राठोड व मोहिना राठोड यांनी त्यांचे हातातील लाकडी काठीने गोरख बालचंद पवार यांचे डोक्यात व पोटात मारुन दुखापत केली. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला संतोष गुलाब राठोड, निर्दोश संतोष राठोड, पुजा संतोष राठोड, मोहीना संतोष राठोड सर्व रा.ओढरे, ता.चाळीसगाव यांच्या विरोधात गुन्हां दाखल झाला आहे. तपास पोलीस करीत आहेत.


## वाढत्या तापमानाने नागरीक हैराण

नगरदेवळा, ता.पाचोरा । वार्ताहर

उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढण्यास सुरुवात झाली असून नागरिकांना उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. सकाळी आठ वाजेपासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत उष्णतेची लाट जाणवत आहे. झाडाची सावली, घरात राहणे नागरिकांनी पसंत केले असून दुपारी रस्ते निर्मनुष्य जाणवू लागले आहेत. या पासून सुटका मिळावी म्हणून कुलरचा वापर जास्त प्रमाणात होताना दिसून येत आहे.

# हरवलेली मन:शांती गीतेच्या ज्ञानातून पुन्हा प्राप्त होऊ शकते- श्री पार्थसारथी प्रभु

पाचोरा । प्रतिनिधी



अध्यात्म आणि भक्तिरस यांच्या संगमातून पाचोऱ्यातील श्री जगन्नाथ इस्कॉन मंदिरात २० एप्रिल रोजी सायंकाळी एक भक्ति भावपूर्ण आणि गहन आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न झाला. भगवद्गीता साप्ताहिक सत्संग अंतर्गत आयोजित या विशेष सत्रात 'गीतेतील तत्वज्ञान आणि भक्तियोग' या विषयावर विवेचन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात संध्याकाळी ६ वाजता मंगलाचरण व भगवान श्रीकृष्णाच्या भजनांनी झाली. मंदिर परिसर नयनरम्य फुलांच्या सजावटीने आणि दीपप्रज्वलनाने उजळून निघाला होता. श्रीमान पार्थसारथी प्रभुजी यांच्या सशक्त आणि चिंतनशील प्रवचनाने वातावरण गहिवरले. त्यांनी गीतेतील अध्यायांचे संदर्भ देत जीवनातील नैतिक मूल्ये, कर्माची शुद्धता, भक्तीचे स्वरूप आणि आत्मोन्नतीचा मार्ग यांचे महत्त्व सांगितले.

आजच्या यांत्रिक जीवनात हरवलेली मनःशांती गीतेच्या ज्ञानातूनच पुन्हा प्राप्त होऊ शकते, असे सांगत प्रभुजींनी उपस्थितांना निःस्वार्थ सेवा आणि नामस्मरणाच्या दिशेने प्रेरित केले.

प्रभुजींच्या शब्दांमध्ये एक गोड संदेश होता, कर्म किए जा फल की चिंता मत कर ए इंसान, जैसे कर्म करेगा वेसे फल देंगे भगवान म्हणजेच, आपल्याला केवळ आपल्या कर्मावर विश्वास ठेवावा लागतो, आणि त्याच्या योग्य फळाची चिंता भगवानावर सोडून आपला मार्गक्रमण सुरू ठेवावा लागतो. यावेळी सामूहिक मंत्रजप, कीर्तन आणि गीता पठण यामध्ये शेकडो भाविकांनी सहभागी होऊन अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव घेतला. हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम, राम राम हरे हरे... या महामंत्राच्या गजरात संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरंगात न्हालेला पाहायला मिळाला.

तसेच येणाऱ्या अक्षय तृतीयेची तयारी कशी करावी व अक्षय फळ, अक्षय कृपा कशी मिळवावी- हेही या सत्रात प्रभुजींनी अतिशय साध्या व भावपूर्ण शब्दांत सांगितले. अक्षय तृतीया विषयी मार्गदर्शन करताना, प्रभुजींनी सांगितले की या दिवशी केलेले जप, दान, व्रत व सत्कर्म हे 'अक्षय' म्हणजेच कधीही नष्ट न होणारे पुण्य फळ देतात. त्यामुळे या दिवशी भगवंताच्या नामस्मरणात आणि भक्तीमय सेवेत वेळ घालवणे, गीता पठण, गरीबांमध्ये अन्नदान किंवा प्रसाद वाटप यासारखी सेवा केल्यास अक्षय फळाची प्राप्ती निश्चित होते. प्रभुजींनी ही सुवर्णसंधी साधण्याचे आवाहन सर्वांना केले.

कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर श्री जगन्नाथजींचा महाप्रसाद भक्तांना वाटप करण्यात आला. विविध प्रकारच्या सत्त्विक अन्नाचा समावेश असलेला हा महाप्रसाद भाविकांनी अत्यंत श्रद्धेने स्वीकारला. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन इस्कॉन पाचोराच्या सेवेकरी भक्तांनी अत्यंत नियोजनबद्ध व सेवाभावाने केले. मंदिराचे व्यवस्थापक तथा संयोजकांनी पुढील काळात असेच अधिकाधिक कार्यक्रम घेण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त केला.

वरखेडी रोडवरील श्रील प्रभुपाद मार्गावर वसलेले हे इस्कॉन मंदिर पाचोऱ्यातील एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र बनले असून, दर आठवड्याला आयोजित होणारे सत्संग, भजन व कीर्तन यात सहभागी होण्यासाठी शहरातील भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.



# आंध्रप्रदेश मधील भाविकांची रूग्णालयातून सुटी

मलकापूर । प्रतिनिधी

गत सप्ताहात गुरुवार रोजी पहाटे दोन वाजे दरम्यान काटी फाट्यानजीक शिर्डी-पंढरपुर देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या लक्झरी बसचा अपघात झाला होता, त्यामध्ये जखमी झालेल्या १८ भाविकांवर मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात तर २४ भाविकांवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू होते. त्या रूग्णांवर उपचारानंतर त्यांची सुटी करण्यात आली.

मलकापुर येथील रुग्णालयातील रुग्णांना पोलिस प्रशासन, महसूल प्रशासन, समाजसेवकांसह नगराध्यक्ष अॅड हरीश रावळ, ओम शांती सेवा समितीचे सचिन भंसाली यांनी तिन दिवस नाश्ता-चहापाणी, जेवण, राहण्याची-झोपण्याची व्यवस्था केली होती.

शनिवार रोजी उपजिल्हा रुग्णालयातुन सुट्टी झाल्याने ते आपल्या गावी कडप्पा आंध्र प्रदेश येथे जाण्यासाठी निघाले होते, प्रशासनाने त्यांची जाण्याची व्यवस्था केली होती.

अपघातानंतर उपचारादरम्यान दोन दिवसात मलकापूर वासियांनी त्यांची जी देखभाल, काळजी करून जखमी भाविकांना प्रेम दिले.निरोप घेतानाही भाविकांचे डोळे भरून आले होते व त्यांनी, महसूल, पोलीस, पत्रकार, वैद्यकीय प्रशासनाचा सत्कार करण्याचे ठरवून डॉ क्षिरसागर, नायब तहसिलदार श्रीकृष्ण उगले, मलकापुर ग्रा.पो.नि संदिप काळे, ओम शांती सेवा समितीचे सचिन भंसाली, शिवसेना शहरप्रमुख (उबाठा) गजानन ठोसर, सिमा काळे सह आदिंचा सत्कार केला.

सर्व भाविकांना उपजिल्हा रुग्णालयातून१०२म्बुलन्सचालक सचिन बढे यांनी रेल्वे स्थानकावर सोडले यावेळी मंडळ अधिकारी के.जी राजपुत, महसूल सेवक निलेश तायडे, आशिष फाटे, निलेश मात्रे,वाहन चालक दिलीप तायडे, दिपक घुस्सर, ज्ञानदेव तायडे, अक्षय लामखेडे, राखोंडे सह आदिंची उपस्थिती होती. आम्ही केलेल्या कार्याची स्तुती करावी अशी आमची इच्छाही नाही, परंतु मलकापूरवासीय, महाराष्ट्र वासियांनी केलेल्या प्रेमाने आंध्रप्रदेशवासी भक्तांचा ऊर भरून आला एवढं मात्र नक्की.

# मुडी प्र.डांगरी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

अमळनेर । प्रतिनिधी



तालुक्यातील मुडी प्र. डांगरी गावात जिल्हा परिषद व डी.पी.डी.सी.च्या जनसुविधा योजनेंतर्गत विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन माजी जि प सदस्या सौ जयश्री अनिल पाटील यांच्याहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

आ.अनिल पाटील यांच्या प्रयत्नातून सदर कामे मंजुर झाली आहेत. ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी मंजूर २० लाख रुपयांच्या निधीतून होणाऱ्या बांधकामाचे भूमिपूजन माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.जयश्री पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी १५ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या तलाठी कार्यालयाचे उद्घाटन बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मंजूर झालेल्या १० लाख रुपये खर्चाच्या रस्ता काँक्रीटीकरण व चौक सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन लोकनियुक्त सरपंच सौ.मंदाबाई भावराव पाटील यांच्या हस्ते पार पडले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने गावामध्ये एक वेगळाच उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या वेळी उदयराजे भावराव पाटील, नानासाहेब पाटील, संजय पाटील, अरविंद हिमतराव पाटील, राजेंद्र वानखेडे, नारायण पाटील, महेंद्र पाटील, हेमंतराव पाटील, पंढरिनाथ पाटील, गौरव पाटील, गणेश भोई, मनोहर पाटील, गणेश बडगुजर, प्रणव पाटील, तुषार पाटील, संजय वडर, उदय पाटील, संजय पाटील, भैय्यासाहेब पवार, किशोर पारधी, ग्रामपंचायत अधिकारी विनोद पाटील तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार अनिल पाटील व सौ. जयश्रीताई पाटील यांच्या प्रयत्नातून गावात होत असलेल्या भौतिक विकासाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.आणि हे कार्य विकासाच्या दिशेने गावाच्या प्रगतीचा ठसा उमटवणारे ठरेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.